**महाराष्ट्र शासन**

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504 नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
फॅक्स क्रं. - 02462-235103 E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट/331/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2024 / दिनांक : 16/09/2024


# 1)मो.सा.चोरी :–

**1)नायगाव :–** दिनांक 12.09.2024 रोजी चे 17.30 ते 18.00 वा. चे दरम्यान, **डॉ. रामशेटवार दवाखाण्यासमोर हेडगेवार चौक नायगाव समोरून ता. नायगांव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची मोटार सायकल क्रं. एमएच.–26/एक्स–3251 किंमती 40,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी महेश गंगाधर पत्तेवार, वय 43 वर्षे, व्यवसाय व्यापार शिवाजी चौक नायगाव ता. नायगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगाव** गुरनं 233/2024 कलम 303(2) भारतीय न्याय संहिता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/349 सांगवीकर, मो.नं. 7875643333** हे करीत आहेत.

# 2)जनावर चोरी :–

**कुंटूर :–** दिनांक 13.09.2024 रोजी चे रात्री 01.30 वा. चे सुमारास, **मौ. देगाव ता. नायगांव येथील शेतशिवारातुन ता. नायगांव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे शेतात आखाडयावर बांधलेले चार जनावरे एक गाय, एक गोरा, एक म्हेस, एक हलगट असे एकुण किंमती 68,000/–रू चे पशुधन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी संतोष शंकरराव कुरे, वय 46 वर्षे, व्यवसाय शेती रा. ताकबीड ता. नायगावं जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरनं 181/2024 303(2) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1198 कंधारे, मो.क्रं. 8556080025** हे करीत आहेत.

# 3)अवैध रेती चोरी :–

**लिंबगाव :–** दिनांक 15.09.2024 रोजी चे 02.30 वा. चे सुमारास, **भवानी मंदीरा समोर रोडवर सुगाव बु. ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररीत्या आपले ताब्यातील टिप्पर क्रं. एमएच–04/डिके–6102 किंमत 5,00,000/–रू त्यामध्ये 02 ब्रास रेती किंमती 10,000/–रूपयाची व दुसरे टिपर क्रमांक एमएच–12/ईएफ–8940 किंमती 5,00,000/–रू त्यामध्ये 02 ब्रास रेती किंमती 10,000/–रू असा एकुण 10,20,000/–रूपयाचे मुद्देमाल रेतीची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतुक करीत असतांना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/2778, प्रकाश विठ्ठलराव पेदेवाड, ने. पोस्टे लिंबगाव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 134/2024 कलम 303(2),3(5) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा सह कलम महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 कलम 48 (7), कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/261 घुन्नर, मो.क्रं. 9657717259** हे करीत आहेत.

# 4)गंभीर दुखापत :–

**1)लोहा :–**दिनांक 15.09.2024 रोजी चे 18.00 वा. चे सुमारास, **मौ. खांबेगाव ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून सुभाषनगर येथे झालेल्या भांडणाचे कारणावरून फिर्यादीस शिवीगाळ व मारहाण करून कांदे कापण्याच्या चाकुने उजव्या हाताचे दंडावर मारून गंभीर दुखापत केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी बालाजी अप्पाराव सोनवणे, वय 35 वर्षे, व्यवसाय शेती व टेन्ट दुकान रा. सुनेगाव ता. लोहा जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 323/2024 कलम 118(2),115(2), 351(2), 352, 3(5) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री बगाडे, मो. नं. 7775901279** हे करीत आहेत.

**2)देगलुर :–**दिनांक 14.09.2024 रोजी चे 20.45 वा. चे सुमारास, **साठे चौक देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून तु अमाचे सोबत लेंडी नदीच्या पुलावर वाद का केलास असे म्हणुन अंगावर येवुन शिवीगाळ करून कंबरेच्या बेल्टने पाठीवर, हातावर मारून, लाकडाने डोक्यात मारून डोके फोडुन गंभीर दुखापत केली व साक्षीदार हे भांडण सोडविण्यास आले असता त्याचे तोंडावर कडयाने मारून दात खुडला व त्याचे ओठास जखमी केले. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी नरसिंग पि. मनोहर हंगरगे, वय 19 वर्षे, व्यवसाय चहापाणी हॉटेल रा. भक्तापुर ता. देगलुर जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 437/2024 कलम 118(2),118(1),115, 351(2), 352, 3(5) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री फड, मो. नं. 9130087444** हे करीत आहेत.

## 5)विवाहीतेचा छळ :–

**1)इतवारा :–** दिनांक 25.01.2020 रोजी चे 20.00 रोजी लग्न झाले नंतर तीन ते चार महीन्या नंतर ते दिनांक 01.07. 2021 रोजी चे दरम्यान, **गुलशन कॉलनी देगलुर नाका नांदेड येथे,** यातील नमुद आकरा आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस गॅरजचा धंदा वाढविण्यासाठी तुझे माहेरहुन पाच लाख रूपये घेवुन ये म्हणुन व फिर्यादीचे गालावर जन्मजात काळा डाग असल्याचे कारणावरून उपाशी पोटी ठेवुन शिवीगाळ व मारहाण करून शारिरीक व माणसीक छळ करून, जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 27 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 344/2024 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन, **तपास पोहेकॉ/1988 मानेकर, मो.क्रं. 9767002111** हे करीत आहेत.

**2)इतवारा :–** सन–2017 ते 2023 चे दरम्यान, **भोईगल्ली इतवारा नांदेड येथे,** यातील आरोपी हा फिर्यादी बाईस कोणत्याना कोणत्या कारणावरून शिवीगाळ व मारहाण करून शारिरीक व माणसीक छळ करून, जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 30 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 345/2024 कलम 498(अ), 323, 504, 506, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन, **तपास पोहेकॉ/1915 कस्तुरे, मो.क्रं. 9764029751** हे करीत आहेत.

## 6)अपघात :–

**कंधार :–** दिनांक 15.09.2024 रोजी चे 14.30 वा. चे सुमारास, **कुरूळा ते अहमदपुर रोडवर कुरळया पासुन एक कि मी अंतरावर रोडवर ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे 1)सुशिल देवराव वाघमारे, वय 32 वर्षे, व्यवसाय खाजगी चालक रा. वाहद ता. कंधार जि. नांदेड** यास यातील नमुद आरोपीने आपली मोटार सायकल क्रमांक एमएच–26/सीडी–0318 स्पलेंडर प्लस ही हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन मयाताचे मोटार सायकल क्रमांक एमएच–26/सीडी–9799 हीस समोरून जोराची धडक देवुन मरणास कारणीभुत झाला. सोबतच्या व्यक्तीस गंभीर जखमी केले. वगैरे **फिर्यादी किरण देवराव वाघमारे, वय 26 वर्षे, व्यवसाय शेती व मजुरी रा. वाहद ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं. 309/2024 कलम 281,125(अ),106 भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2084 श्रीरामे, मो.नं. 9890347022** हे करीत आहेत.

## 7)अपहार :–

**लोहा** :– दिनांक 23.08.2023 रोजी चे 10.00 ते दिनांक 12.09.2023 चे 18.00 वा. चे दरम्यान, **छत्रपती शिवाजी महाराज चौक लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीकडुन 167.25 क्विंटल सोयाबीन प्रति क्विंटल 5200/–रू प्रमाणे 8,69,700/–रू व तुर किमत 2,82,246/–रू असे एकुण 11,51,946/–रू चे सोयाबीन व तुर विकत घेवुन सदर मालाची रक्कम एक महीण्यात आणुन देतो असे लेखी आश्वासन दिले होते. परंतु अद्याप पर्यंत फिर्यादीला त्यांचे पैसे परत न करता त्यांनी अपहार करून फसवणुक केली. वगैरे वरून मा. प्रथम वर्ग दंडाधिकारी लोहा यांचे आदेशान्वये 156(3) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. वगैरे **फिर्यादी बालाजी कंठीराम डिकळे, वय 38 वर्षे, व्यवसाय शेती व व्यापार रा. पारडी ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं. 322/2024 कलम 409, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री पाटील, मो. नं. 9730887298** हे करीत आहेत.

## 8)जुगार :–

**1)उमरी :–** दिनांक 15.09.2024 रोजी चे 17.15 वा. चे सुमारास, **वाल्मीक मंदिराच्या पाठीमागे तळेगाव ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररीत्या झन्ना मन्ना नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 2570/–रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/69 अरविंद विठ्ठल हैबतरकर, ने पोस्टे उमरी** यांनी दिलेल्या फिर्यादवरून **पोस्टे उमरी** गुरनं 320/2024 कलम 12(अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2336 जाधव, मो. नं. 9421841380** हे करीत आहेत.

## 9)प्रोव्हिबीशन :–

**1)हिमायतनगर :–** दिनांक 15.09.2024 रोजी चे 12.30 वा. चे सुमारास, **आरोपीचे टिन पत्राचे हॉटेल वज्रधारी धाब्यामध्ये मौ. खडकी बाजार ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी/विदेशी दारू किंमती 7,260/–रूपयाचा माल व नगदी 6500/–रू असा एकुण 13,760/–रू चा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने आपले ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/अशोक शेषेराव शिंगणवाड, ने. पोस्टे हिमायतनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 228/2024 कलम 65(ई), मप्रोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री कदम, मो.नं. 7350671239** हे करीत आहेत.

**2)देगलुर :–** दिनांक 15.09.2024 रोजी चे 18.00 वा. चे सुमारास, **भायेगाव रोडवरील लेंडी नदीच्या पुलाच्या आलीकडे ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 13,440/–रू चा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने आपले ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2562 सुनिल ओमप्रकाश पत्रे, ने. पोस्टे देगलुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 438/2024 कलम 65(ई), मप्रोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/265 शेख, मो.नं. 9823042107** हे करीत आहेत.

**3)वजिराबाद :–** दिनांक 15.09.2024 रोजी चे 08.29 वा. चे सुमारास, **श्रीमान श्रीमती दुकानासमोरील रोडवर चिखलवाडी नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 2975/–रू चा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने आपले ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/419 बापुराव यादवराव डवरे, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 461/2024 कलम 65(ई), मप्रोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1419 डवरे, मो.नं. 9923619820** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

---

जा.क्रं./ प्रेस नोट / 330 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2024 /           दिनांक : 16 / 09 / 2024

---

## जनावरे चोरणारे टोळीस अटक करून 11 गुन्हे उघडकीस
## सोनखेड पोलीस स्टेशनची कारवाई

मागील काही दिवसापासुन पोलीस स्टेशन सोनखेड अंतर्गत तसेच परिसरातुन मोठया प्रमाणात जनावरे चोरी जाण्याचे प्रमाणात वाढ झाल्याने ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत **मा. श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधिक्षक, नांदेड यांचे आदेशाने पोलीस स्टेशन सोनखेड येथे विशेष पथक गठीत करून जनावरे चोरी करणारे सराईत गुन्हेगारांचा शोध मोहिम आयोजित केली होती.

त्या अनुषंगाने दिनांक 15.09.2024 रोजी पोलीस स्टेशन सोनखेड येथील विशेष तपास पथकाकडुन आरोपींचा शोध घेत असतांना पथकास गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशिर माहिती मिळयाल्याने पोलीस स्टेशन सोनखेड हद्दीतील व नांदेड जिल्हयातील विविध ठिकाणी छापा मारून संशयीत आरोपी नामे **1. रघुनाथ किशन मगरे वय 40 वर्षे, 2. निखील बालाजी कोल्हे वय 24 वर्षे दोघे रा. काकांडी, 3. निलेश आनंदा हनवते वय 23 वर्षे रा. टेळकी, 4. अरविंद भिमराव हटकर वय 27 वर्षे रा. इजळी, 5. आकाश वसंत गजभारे वय 22 वर्षे रा. मेंडला, 6. महमद अलताफ महमद आयुब कुरेशी वय 32 वर्षे रा. देगुलर नाका, नांदेड** यांना ताब्यात घेवून पोलीस स्टेशन सोनखेड येथे आणुन त्यांची जनावरे चोरी बाबत चौकशी केली असता मागील एक ते दिड वर्षापासुन नमुद आरोपीतांनी दोन पिकअप व मोटार सायकल चा वापर करून नांदेड पासुन 40 ते 50 कि.मी. च्या परिसरात आज पावेतो एकुण 40 जनावरे चोरीचे गुन्हे केल्याचे कबुली दिली आहे. सदर जनावरे चोरी करण्यासाठी **आरोपी नामे महमद अलताफ महमद आयुब कुरेशी वय 32 वर्षे रा. देगुलर नाका, नांदेड** याने नमुद आरोपीतांना जनावरे चोरी करणे, टेहळणी करणे व मोटार सायकलवर फिरण्यासाठी पैशाचा पुरवठा करून त्यांच्याकडुन चोरी करून घेतलेली जनावरे स्वतः कमी दारात खरेदी करून जनावरे कटई करून त्यांचे मास विक्री केल्याचे निष्पन्न झाले आहे.

वरील जनावरे चोरी करणारे आरोपी कडुन चोरी करण्यासाठी वापरण्यात येणारी वाहने व जनावरे विक्री केल्याचे रोख रक्कम असा एकुण 4,20,000 /—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस स्टेशन सोनखेड चे एकुण 08 गुन्हे व पोलीस स्टेशन मुदखेड चे 03 गुन्हे असे एकुण 11 गुन्हे उघडकीस आले आहेत.

सदरची कामगीरी **मा. श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधीक्षक नांदेड, **मा. श्री खंडेराव धरणे,** अपर पोलीस अधिक्षक, भोकर, **मा. श्री सुरज गुरव,** अपर पोलीस अधीक्षक नांदेड, **मा. श्री सुशिलकुमार नायक,** उपविभागीय पोलीस अधिकारी इतवारा, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली **सपोनि श्री पांडुरंग माने,** मपोउपनि वैशाली कांबळे, सहा. पोउपनि गणपत गिते, पोहेकॉ विश्वनाथ हंबर्डे, वामन नागरगोजे, अंगत कदम, श्याम बनसोडे, पोकॉ रमेश वाघमारे, त्रिशुल शंकरे, महेश शंकरे, दिगांबर कवणे, मपोना संतोषी मल्लेवार, वाहन चालक केशव मंडकर, उत्तम देवकत्ते यांनी पार पाडली आहे, वरिष्ठांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड